दि. 8 डिसेंबर,2013

**विधानसभा निवडणुकांचे निकाल हे 2014 च्या लोकसभा निवडणुकांसाठीचा रस्ता आहे.**

अरुण जेटली

विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल घोषित झाले. भाजपा त्याबद्दल समाधानी आहे. मध्य प्रदेश हे भाजपासाठी सुशासनाचे उत्तम उदाहरण आहे. श्री शिवराज सिंह चौहान हे या राज्याचे प्रतिनिधित्त्व करतात ज्यांनी या आजारी राज्याची ओळख पुसून टाकून राज्याला विकासपथावर आणले. भाजपाचे नेटवर्क खुप मोठे आहे हे यावरुन स्पष्ट होते आणि भाजपाने ज्या सामाजिक योजना राबविल्या होत्या त्या यशस्वी झाल्या. कॉग्रेसच्या विरोधात जनमत वाढल्याने भाजपाला राज्यात तीन वेळा प्रतिथयश मिळाले.

छत्तीसगड हे मध्यप्रदेशातून वेगळे करण्यात आले आहे जिथे भाजपाचा गड नव्हता.

मध्यप्रदेश मध्ये भाजपाला मिळालेल्या विजयामुळे भाजप तिस-यांदा सरकार स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहे. जर या दोन राज्यांची सरकारे 2018 पर्यंत सलग राहिली तर छत्तीसगड आणि मध्यप्रदेश मधील मागील कॉग्रेसची सत्ता ही 1998 पर्यंतच राहील. म्हणजेच वीस वर्षापूर्वीची राहील. राजस्थानमधील विजय हा भाजपासाठी खुप महत्त्वाचा आहे. श्रीमती वसुंधरा राजे यांच्या नेतृत्त्वाला सर्वांनी पसंती दिली. राज्यात प्रचारानंतर मी एक वक्तव्य केले होते की मी भाजपाचा लोकांमध्ये रोमांच आणणारा प्रचार पाहिला आहे. भाजपाने इथे फार मोठ्या बहुमताने विजय मिळवला आहे. आम्ही 82 टक्के जागांवर विजयी झालो आहोत.

दिल्लीत सुद्धा आम्ही एक मोठा पक्ष आहोत आणि बहुमताच्या अगदी जवळ आहोत. इथला निकाल आमच्या अपेक्षेच्या खाली आला. आम्ही अपेक्षा केली होती की 5-6 जागा आम्हाला आणखी मिळतील. आम आदमी पार्टीला माझ्या हार्दीक शुभेच्छा आहेत, आम आदमी पार्टीने पहिल्याच निवडणुकीत अभुतपूर्व यश मिळविले. आप चा प्रचार लोकांनी लक्षपूर्वक ऐकला आहे. त्यांची लोकांशी संपर्क साधण्याची कला खुप प्रभावकारी होती. तथापि, खुप मोठ्या कालावधीपर्यंत निराशावादावरील प्रचार हा अनिश्चित काळापर्यंत चालू ठेवणार याचे परिक्षण झाले आहे.

भाजपाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल माझ्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांना माझ्या हार्दीक शुभेच्छा आहेत. श्री नरेंद्र मोदी हे देखील शुभेच्छांचे भागीदार आहेत ज्यांनी सर्व राज्यात व्यापक स्वरुपात प्रचार केला.

हा निकाल पुढच्या लोकसभा प्रचारासाठी खुप उपयोगी पडेल. 72 लोकसभा मतदार जागांवर या विधानसभा निवडणुका होत्या. त्यामध्ये कॉंग्रेसला खुप कमी जागा मिळाल्या. अंकगणितानुसार भाजपने त्यापैकी 65 जागांवर विजय मिळविला. लोकसभा निवडणुकीत आता भाजप आणि कॉंग्रेसमध्येच मोठी चुरस आहे. हा निकाल भविष्याला सूचित करतो. विधानसभा निवडणुकीचा स्ट्राईक रेट 70 टक्के इतका वाढला. हा काही कमी पराक्रम नाही.